**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**"उपकेंद्र सहाय्यक" पदाकरिता जाहिरात क्र. ०५/२०१९ मधील मुद्दा क्र. ३.२ (अ) नुसार**
**अतिरिक्त निवड यादी**

१) महावितरण कंपनीमध्ये **"उपकेंद्र सहाय्यक"** या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता तीन वर्षाच्या निश्चित कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने उमेदवारांची निवड करण्याकरिता जाहिरात क्र. ०५/२०१९ ही माहे जुलै २०१९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली होती. जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २६/०७/२०१९ अशी होती.

२) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची वस्तुनिष्ठ स्वरुपाची ऑनलाईन क्षमता चाचणी दिनांक २५/०८/२०१९ रोजी घेण्यात आली होती. जाहिरातीमधील शैक्षणिक अर्हता, अनुभव, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेली माहिती व उमेदवारांना ऑनलाईन क्षमता चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे पात्र उमेदवरांची निवड यादी दिनांक २८/०६/२०२० रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

३) तथापि, ज्या उमेदवारांनी जाहिरातीमधील मुद्दा क्र. ३.२ (अ) नुसार "तदर्थ मंडळ/महावितरण/ महापारेषण/ महानिर्मिती कंपनीमध्ये वीजतंत्री/तारतंत्री मधून शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे अशा उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी कालावधी अनुभव म्हणून ग्राह्य धरुन एकूण अनुभव २ वर्षे अथवा त्यापेक्षा जास्त होत आहे अशा पात्र उमेदवारांची अतिरिक्त (Additional) निवड व अतिरिक्त (Additional) प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येत आहे."

४) **वरील मुद्दा क्र. ३ नुसार प्रसारीत करण्यात येत असलेली अतिरिक्त निवड व अतिरिक्त प्रतिक्षा यादी ही दिनांक २८/०६/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या निवड यादी व प्रतिक्षा यादीसह अतिरिक्त (Additional) असेल.**

५) जाहिरातीमधील मुद्दा क्र. ३.२ (अ) नुसार ज्या उमेदवारांना, दिनांक २८/०६/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या संबंधित प्रवर्गाच्या व समांतर आरक्षणाच्या शेवटच्या उमेदवाराच्या गुणा (Cut off Marks) एवढे अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाले आहेत अशा पात्र उमेदवारांचा अतिरिक्त निवड व अतिरिक्त प्रतिक्षा यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

६) **यापूर्वी दिनांक २८/०६/२०२० रोजी व आज दिनांक २२/०८/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या फक्त निवड यादीमधील उमेदवारांची त्यांच्या ऑनलाईन अर्जामधील नोंदी/अर्हता संबंधित प्रमाणपत्रांची पडताळणी दिनांक १५ व १६ सप्टेंबर, २०२० रोजी करण्यात येईल.**

७) **सदर कागदपत्रांची पडताळणी ही मंडल कार्यालय स्तरावर करण्यात येईल, तसेच याबाबत एकत्रित (दिनांक २८/०६/२०२० व आज दिनांक २२/०८/२०२० रोजी प्रसिध्द झालेल्या) निवड यादीनुसार कागदपत्र पडताळणीबाबतची मंडलनिहाय सविस्तर माहिती महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर दिनांक १० सप्टेंबर, २०२० पूर्वी प्रसिध्द करण्यात येईल. याकरीता निवड झालेल्या सर्व उमेदवारांनी वेळोवेळी कंपनीच्या संकेतस्थळाचे (www.mahadiscom.in) अवलोकन करावे.**

८) **निवड झालेल्या सर्व उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून म.रा.वि.वि. कंपनीमध्ये "उपकेंद्र सहाय्यक" या वर्ग ३ चे पदावर सेवेकरीता पात्रतेसंबंधातील वैद्यकीय तपासणी करुन घ्यावे. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून सदर पदावर नियुक्तीकरीता पात्र असलेबाबतचे प्रमाणपत्र घ्यावे, जेणेकरुन उमेदवाराची कागदपत्र पडताळणी यशस्वी पार पडल्यानंतर पात्र उमेदवारांना त्वरीत नियुक्ती आदेश देणे शक्य होईल. सदर वैद्यकीय तपासणी/चाचणीकरीता ओळखपत्र/परिचयपत्र म्हणून उमेदवारांनी त्यांचे आधारकार्ड/मतदान ओळखपत्र/पासपोर्ट/वैध वाहन परवाना यापैकी एक जिल्हा रुग्णालयाकडे तपासणी वेळी उपलब्ध करणे आवश्यक राहील. याकरीता जिल्हा शल्य चिकित्सक यांना कंपनीमार्फत द्यावयाच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.**

९) निवड झालेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार महावितरण कंपनीमध्ये कार्यरत कर्मचारी आहेत अशा उमेदवारांना वैद्यकीय प्रमाणपत्र घेणे आवश्यक असणार नाही.

**१०) जे उमेदवार त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी व वैद्यकीय तपासणी/चाचणी यशस्वीरित्या पार पाडतील अशा सर्व उमेदवारांना कागदपत्र पडताळणीनंतर सक्षम अधिकारी यांचेकडून नियुक्ती आदेश देण्यात येतील.**

११) उमेदवारांनी कागदपत्र पडताळणकरीता आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरुन कागदपत्र पडताळणीवेळी आवश्यक ती सर्व कागदपत्रे पडताळणीकरीता सादर करणे शक्य होईल.

१२) निवड प्रक्रिया ही मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल याचिका क्र. ४९४६/२०२०, याचिका क्र. १२२६०/२०२० व याचिका क्र. १२२८१/२०२० च्या आदेशाच्या/निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१३) सदरची अतिरिक्त निवड यादी ही जाहिरातीमधील मुद्दा क्र. १ टीप, मुद्दा क्र. ११.५ व मुद्दा क्र. ११.१० च्या अधीन राहून घोषित करण्यात येत आहे.

१४) दिनांक २८/०६/२०२० रोजी निवड यादी प्रसिध्द करताना निर्गमित केलेल्या उर्वरीत सूचना तसेच कागदपत्रे तपासणीकरीता आवश्यक कागदपत्रांबाबतच्या सूचना कायम असतील.

**दिनांक : २२/०८/२०२०**

**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**सोबत :-**

**अतिरिक्त निवड यादी**

**अतिरिक्त प्रतिक्षा यादी**

**प्रवर्गनिहाय गुणनिहाय कट ऑफ तक्ता**

**जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेसाठीच्या पत्राची प्रत**

**उमेदवारांना ऑनलाईन क्षमता चाचणीमध्ये स्वत:चे प्राप्त झालेले गुण पहाणेसाठीची URL Link**